CMYK



क्रांतीज्योती
**सावित्रीबाई फुले**
यांच्या स्मृतिदिनानिमित्त
विनम्र अभिवादन


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड





वृत्त : पान ७ व ८ वर

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १० मार्च २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १६० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# फडणवीसांच्या पंचामृत कलशातून सोलापूरवर सातशे कोटींचा वर्षाव



✔ सुराज्य/सोलापूर

राज्याच्या शिंदे-फडणवीस सरकारमधील उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच सादर केलेल्या यंदाच्या 'पंचामृत' अर्थसंकल्पातून सोलापूर शहर आणि जिल्ह्यावर तब्बल सातशे सात कोटींचा वर्षाव करण्यात आला आहे. राज्यात पहिल्यांदाच सोलापूरमध्ये स्थापन होत असलेले श्री अन्न उत्कृष्टता केंद्र, सोलापूर -तुळजापूर ब्रॉडगेज रेल्वेमार्ग आणि सोलापूर विद्यापीठ आदींसाठी या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करून अर्थमंत्र्यांनी सोलापूरला मदतीचा हात दिला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पाच्या धर्तीवर राज्याचा अर्थसंकल्प 'पंचामृत' ध्येयावर आधारित आहे. शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी, सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास (महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसी), भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधांचा विकास, रोजगारनिर्मिती (सक्षम, कुशल, रोजगारक्षम युवा), पर्यावरणपूरक विकास या पंचामृत धर्तीवर अर्थसंकल्प सादर केला आहे. सोलापूरच्या पदरी या पंचामृत कलशातून तब्बल सातशे कोटींपेक्षा अधिकची तरतूद करण्यात आली आहे.

## ▸ श्री अन्न उत्कृष्टता केंद्रासाठी २०० कोटी,
## ▸ सोलापूर-तुळजापूर ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी ४५२
## ▸ सोलापूर विद्यापीठासाठी ५५ कोटींची घोषणा

१. सोलापूर विभागातून सोलापूर-तुळजापूर-धाराशिव ब्रॉडगेज हा ८४ किलोमीटरचा मार्ग जाणार आहे. या योजनेसाठी राज्यशासनाचा हिस्सा म्हणून ४५२ कोटी रुपयांची घोषणा अर्थमंत्री फडणवीस यांनी केली. तसेच नांदेड, बीदर, फलटण, पंढरपूर, खामगाव, जालना आणि वरोरा, चिमूर या रेल्वे प्रकल्पासाठी देखील राज्यशासनाचा पन्नास टक्के हिस्सा देण्याची घोषणा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

२. सोलापूर जिल्हा ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जातो. यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून जाहीर केले आहे. या निमित्त सोलापूर शहरात श्री अन्न उत्कृष्टता केंद्र स्थापन केले जाणार आहे. यासाठी तब्बल दोनशे कोटींची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात डाळिंबाचे उत्पादन होत असल्याने देशातील पहिले डाळिंब संशोधन केंद्र सोलापुरात स्थापन झाले. त्याच धर्तीवर आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त राज्यातील पहिले श्री अन्न उत्कृष्टता केंद्र सोलापुरात स्थापन केले जाणार आहे.

३. एकमेव सोलापूर जिल्ह्यासाठी असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठासाठी ५५ कोटींचे अनुदान यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे. या निधीतून परीक्षा भवनाची इमारत उभी केली जाणार आहे.

४. राज्यातील नाट्यगृहांच्या दुरुस्तीसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिराचा समावेश असल्याने दुरुस्तीसाठी कोट्यवधींचा निधी मिळणार आहे.


५. जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन वाढीसाठी शक्तिपीठ महामार्ग तयार करण्यात येणार आहे. यामध्ये ७६० कि.मी महामार्ग बांधण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, अक्कलकोटसह गाणगापूर व तुळजापूर तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या शक्तिपीठ महामार्गासाठीसुध्दा या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली आहे.

## पंढरपुरातील बोगस डॉक्टरला दोन वर्षे कारावास

✔ सुराज्य/पंढरपूर

कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना आपण डॉक्टर आहे असे भासवून चुकीच्या पद्धतीने उपचार करून रुग्णांना फसवणाऱ्या बंगाली डॉक्टरला पंढरपूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती बनसोडे यांनी दोन वर्षे सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

पंढरपूर तालुक्यातील तुंगत या गावात विबास ऊर्फ विभास विरेन रॉय हा वैद्यकीय महाविद्यालयाची पदवी नसताना तसेच वैद्यकीय व्यवसायाचे कायदेशीर ज्ञान नसताना आणि इंडियन मेडिकल कौन्सिलची नोंदणी नसताना आपण डॉक्टर आहे; असे भासवून रुग्णांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक करून त्यांच्यावर चुकीच्या पद्धतीने उपचार करून



बेकायदेशीररीत्या वैद्यकीय व्यवसाय करून जनतेच्या आरोग्यास व जीवितास धोका निर्माण करीत असताना पोलिसांना सापडला होता.

त्याच्यावर भा.दं.वि. ४१९, ४२० तसेच इंडियन मेडिकल कौन्सिल आणि इतर कायद्यान्वये पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम आणि पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास हा सहाय्यक फौजदार अशोक जाधव यांनी करून न्यायालयात बोगस डॉक्टर विरोधात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणांमध्ये एकूण दहा साक्षीदार तपासण्यात आले.

सहकारी के. एस. देशमुख यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने बोगस डॉक्टर विबास ऊर्फ विभास विरेन रॉय (रा. पश्चिम बंगाल) याला विविध कलमांतर्गत दोन वर्षांची शिक्षा आणि दंड ठोठावला आहे.

## पोखरापुरात मंदिराजवळ समाधी अवस्थेत आढळला प्राचीन सांगाडा

✔ सुराज्य/मोहोळ

पोखरापूर (ता. मोहोळ) येथे जगदंबा मंदिराजवळ समाधी अवस्थेत मानवी सांगाडा मिळून आला असून ती समाधी कोणाची ? तेथे भुयार आहे काय? कोणत्या महाराजांची समाधी आहे? याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. राष्ट्रीय महामार्गाच्या संपादित क्षेत्रात प्राचीन जगदंबा देवीचे मंदिर पुनर्रोपण करण्याचे काम शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या वतीने युद्धपातळीवर हाती घेण्यात आलेले आहे.

मंदिर परिसरात उत्खनन करत असताना एका समाधीच्या खाली दगडी बांधकामाच्या खोलीत प्राचीन मानवी सांगाडा आढळून आला आहे. त्यामुळे हा मानवी सांगाडा प्राचीन स्वामींची संजीवन समाधी आहे का? याबाबत



उत्सुकता लागून राहिली आहे. याशिवाय बाजूला खोली आहे की त्या भागातून भुयार आहे हे अद्याप समजले नाही. यापुढील उत्खनन थांबवण्यात आले असून पुरातत्त्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. त्यामुळे ते आल्यानंतर पुढील उत्खनन करण्यात येणार असल्याचे तेथील पुरातन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे त्या ठिकाणी नेमके काय काय आहे हे समजण्यास मार्ग नाही.

काहींच्या मते तो सांगाडा तेथील महाराजांची समाधी असावी व ती सातशे ते आठशे वर्षांपूर्वीची असावी, अशीही चर्चा सुरू आहे. काहींच्या मते बांधकाम खेड्यांमधील दिसून येत आहे. त्यामुळे शंभर वर्षाच्या पूर्वीच्या असावा, असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. ही समाधी पाहण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील नागरिक गर्दी करत आहेत.




भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील विशेष सामन्याला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अल्बनीज हे कसोटी सामना पाहण्यासाठी मैदानात उपस्थित राहिले.

## गतिरोधकावरून पडलेल्या दुचाकीवरील महिलेचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

दुचाकी पाठीमागे बसून प्रवास करताना गतिरोधकावर वाहन आदळून खाली पडून जखमी झालेल्या वृद्ध महिलेचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी दुपारी मयत झाली. गुंडम्मा सिद्धप्पा गुडोडगी (वय ६१ रा. नितीन नगर, अक्कलकोट) असे त्या मयत महिलेचे नाव आहे.त्या ३ मार्च रोजी दुपारी आपल्या मुला सोबत मोटरसायकल वरून सोलापूरहून रुद्देवाडी येथे निघाल्या होत्या निघाल्या होत्या. अक्कलकोट तालुक्यातील रुद्देवाडी येथे गतिरोधकावरून खाली कोसळून होत्या जखमी झाल्या होत्या. त्यांना दुधनी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात शिवानंद (मुलगा) याने दाखल केले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते सतीश कौशिक यांचे निधन

✔ सुराज्य/मुंबई

प्रसिद्ध अभिनेते सतीश कौशिक यांचे निधन झाले आहे. वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. सतीश कौशिक यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं.

आता त्यांच्या निधनानं बॉलिवूडवर शोककळा पसरली आहे. सतीश कौशिक यांचे पार्थिव सध्या दिल्लीतील फोर्टिस रुग्णालयात ठेवण्यात आला आहे. शवविच्छेदनानंतर दुपारी त्यांचे पार्थिव मुंबईत आणले जाईल आणि त्यानंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. सतीश कौशिक हे गुडगाव येथील एका फार्महाऊसवर कोणालातरी भेटण्यासाठी गेले होते. फार्म हाउसवरून परतत असताना सतीश कौशिक यांना कारमध्ये हृदयविकाराचा झटका आला आणि त्यानंतर त्यांना गुडगावच्या फोर्टिस रुग्णालयात नेण्यात आले होते. सतीश कौशिक यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं. आता त्यांच्या निधनानं बॉलिवूडवर शोककळा पसरली आहे. अनेक सेलिब्रिटींनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून सतीश कौशिक यांना श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील ट्वीट शेअर करून सतीश कौशिक यांना श्रद्धांजली वाहिली.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आधीच अवकाळीने मारलं, आपण नको काही करायला !

| कल्याण |
|---|
| 568-93-238 |

| मेन बाजार |
|---|
| 140-51-579 |

# संत चोखामेळा यांचे मंदिर पडले

## ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

✔ सुराज्य/पंढरपूर

**येथील तुळशी वृंदावन येथे विविध संतांची मंदिरे उभारण्यात आली होती. त्यापैकी संत चोखामेळा यांचे मंदिर अचानक पडले आहे. त्यामुळे संत चोखामेळा यांची मूर्ती देखील फुटली आहे. केवळ चार वर्षात बांधलेले मंदिर पडल्यामुळे तुळशी वृंदावनाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप होत आहे.**

वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून पंढरपुरात भव्य तुळशी वृंदावन बांधण्यात आले. भाविकांना तुळशींचे प्रकार आणि विविध संतांची मंदिरे, तैलचित्रे येथे रेखाटण्यात आली आहेत. २५ जानेवारी २०१९ ला लोकार्पण करण्यात आले होते. मात्र केवळ चार वर्षात चोखामेळा यांचे मंदिर पडल्यामुळे



संबंधित ठेकेदारांवर आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी रिपाइं आठवले गटाकडून करण्यात आली आहे.

विठ्ठलाला प्रिय असलेल्या तुळशीचे विविध प्रकार भाविकांना पाहता यावेत हा यामागचा प्रमुख उद्देश होता. या वृंदावनात सात प्रमुख संतांची संगमरवरी मंदिरेही उभारण्यात आली होती. कोट्यवधी रुपये खर्चून चार वर्षांपूर्वी हे काम झाले होते. २०१९ साली या तुळशी वृंदावनाचे लोकार्पण करण्यात आले होते. याच तुळशी वृंदावनात संत चोखामेळा यांचे मंदिर होते. ते मागच्या दोन दिवसात पडले आहे. कोसळलेल्या मंदिरातील चोखामेळा यांची मूर्ती देखील तुटली आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे हे मंदिर कोसळल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळेच हा प्रकार घडला असावा, असाही आरोप स्थानिक नागरिक व भाविकांनी केला आहे. राज्य सरकार आता याबाबत नेमका काय खुलासा करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

चार वर्षापूर्वी बांधलेले संत चोखामेळा मंदिर पडल्यामुळे संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे.

CMYK